**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार**

(गुगल मीट अॅपद्वारे ऑनलाईन सुनावणी )

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औंरगाबाद-४१३ ००१

**तक्रार क्रमांक २४८/२०१६ (द्वितीय अपील क्र.१६०७/२०१५ मध्ये)**

श्री. जगदीश गुलाबचंद भूतडा,
द्वारा मुकेश मिशनरी ,
मेन रोड, मंठा ता. मंठा, जि. जालना **तक्रारदार**

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा **उत्तरवादी**
नगरपंचायत मंठा जि. जालना

२. विस्तार अधिकारी (पंचायत) ,
पंचायत समिती मंठा , जि. जालना

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
१. मुख्याधिकारी , नगरपंचायत कार्यालय मंठा जि. जालना
२. गटविकास अधिकारी पंचायत समिती मंठा जि. जालना

**( सुनावणी दिनांक २९.०९.२०२१)**

**निर्णय**

तक्रारदार यांनी दि.२१.१२.२०१६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे द्वितीय अपील क्र.१६०७/२०१५ मध्ये आयोगाने दि.१९.०९.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीची गुगल मीट अॅपद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल तक्रारदार आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. तसेच सदर नोटीस आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली व सर्व संबंधितांनी सदर प्रकरणासंदर्भातील कागदपत्रे सुनावणीपुर्वी इ-मेलद्वारे सादर करण्यात आले. त्यानुसार आज प्रकरणात गुगल मीट अॅपद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात येत आहे. ऑनलाईन सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित असुन जन माहिती अधिकारी, व प्रथम अपिलीय अधिकारी,अनुपस्थित आहेत. यापूर्वी सदर प्रकरणामध्ये दि.३१.०५.२०१८ ,दि. ३०.०६.२०१८, दि.१२.१०.२०१८, दि२९.१०.२०१८. दि.३०.०८.२०१९,दि.१८.०२.२०२० रोजी सुनावणी ठेवण्यात आले होते.

आज रोजी सुनावणीच्यावेळी तक्रारदार यांनी आयोगासमोर असे कथन केले की, आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

१. आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, असे दिसून येते की, महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना दि.११ जून २०१५ नुसार महाराष्ट्र शासनाने जालना जिल्हातील मंठा या

ग्रामपंचायतीचे स्थनिक क्षेत्र ,ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रामध्ये संक्रमण क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केले आहे. आणि या क्षेत्राकरिता मंठा नगर पंचायत गठित केली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयातील अभिलेख हे सर्व सदरील अधिसूचनेनुसार नगरपंचायत कार्यालय मंठा यांच्याकडे हस्तांतरीत झाले असावेत असे दि.२४.०६.२०१५ च्या पत्रातून तहसीलदार,मंठा तथा प्रशासक नगर पंचायत मंठा यांनी यांच्याकडे अभिलेख सादर करणेबाबत सूचना ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत मंठा,ता.मंठा,जि.जालना यांना केला आहेत. या सर्व वस्तुस्थितीचा विचार करता तात्कालीन ग्रामपंचायतचे अभिलेख हे विदयामान नगर पंचायत कार्यालयात उपलब्ध असतील .

आयोगाने द्वितीय अपील क्र. १६०७/२०१५ मध्ये दि.१९.०९.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्याबाबतचा कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केलयाचे दिसून येत नाही.

ही बाब विचारात घेता,विदयामान जन माहिती अधिकारी तथा नगर पंचायत कार्यालय मंठा,ता.मंठा जि.जालना यांनी आयोगाने द्वितीय अपिलामध्ये दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही १५ दिवसात करावी, असे त्यांना निर्देशित करण्यात येत आहे. आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी कार्यवाही करतील ही बाब जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांनी पहावी व त्यासंदर्भात अहवाल आयोगास १५ दिवसात सादर करावा, याकरिता कलम १९(८)(क)१९(७) नुसार प्राप्तअधिकारानुसार जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग

प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाचे अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायदयाच्या उल्लंघन करणाऱ्या ठरतात. या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अशा सर्व कृती अनुसरुन अधिनियमातील कलम २०(१) नुसार करावयाच्या कारवाईस स्वत: ला पात्र ठरविलेले आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय मंठा ता.मंठा,जि.जालना यांना या प्रकरणी रु.५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार) इतकी शास्ती अंतिम करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, वर नमूद केल्याप्रमाणे जबाबदार जन माहिती अधिकारी यांची नावे निश्चित करुन त्यांचेकडून शास्तीची रक्कम वसूल करुन ती खालील लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(८) (क) व कलम १९ (७)अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| **लेखाशिर्ष** | :- | **००७०- इतर प्रशासनिक सेवा** |
| | :- | **६०- इतर सेवा** |
| | :- | **८००- इतर जमा रक्कम** |
| | :- | **१८- माहिती अधिकार ००७०-००६-१** |

वर नमूद केल्याप्रमाणे शास्तीची वसुली करण्यात आल्यानंतर त्या संदर्भातील अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांनी आयोगाकडे सादर करावा.

प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांना माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता पाठपुरावा करावा लागला. त्याचा त्यांना शारिरीक व मानसिक त्रास झाला. म्हणून ते नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरत आहेत. सबब, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(८)(ख) नुसार अर्जदार यांना या प्रकरणी रु.२,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे. सदर नुकसान भरपाईची रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय मंठा ता.मंठा,जि.जालना यांच्याकडून वसूल करुन ती तक्रारदार यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत धनादेशाद्वारे उपलब्ध करुन दयावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त विवेचनाच्या अधिन राहून विचाराधिन तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद

**( दिलीप ल. धारुरकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 704 दि. 11/2/2022

**प्रत** :- माहिती तथा कार्यवाही / अंमलबजावणीस्तव अग्रेषित.

१. जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,जालना
२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,जालना
३. विदयामान जन माहिती अधिकारी तथा नगर पंचायत कार्यालय मंठा,ता.मंठा,जि.जालना यांना मार्फत जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय जालना
४. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मंठा,ता.मंठा जि.जालना यांना मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद जालना